

रस्त्यांचे खोदकाम वाहतूकदारांसाठी डोकेदुखी » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



हैदराबादच्या ओपनरने मोडला राहुलचा विक्रम » पान ४ वर

वेर्णा, सोमवार, १४ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 221 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 14 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### रशियाचा युक्रेनी शहरावर बॅलेस्टिक क्षेपणास्त्र हल्ला

**कीव, दि. १३ :** रशियाने युक्रेनच्या सुमी शहरावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला केला आहे. यामध्ये २१ जणांचा मृत्यू झाला आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी ट्विटरवर हल्ल्याचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये मृतांचे मृतदेह रस्त्यावर विखुरलेले दिसत आहेत. यावेळी, एक व्यक्ती दुसऱ्या जखमी व्यक्तीला घेऊन जाताना दिसली. रशियाने युक्रेनवर हा हल्ला तेव्हा केला आहे जेव्हा दोन दिवसांपूर्वीच अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ युद्धबंदीवर चर्चा करण्यासाठी रशियाला भेट दिली होती. यावेळी त्यांनी पुतिन यांच्याशीही चर्चा केली. शनिवारी युक्रेनवर झालेल्या रशियन क्षेपणास्त्र हल्ल्यात कुसुम या भारतीय औषध कंपनीच्या गोदामाला आग लागली. भारतातील युक्रेनियन दूतावासाने रशियावर राजधानी कीवमधील भारतीय गोदामाला जाणूनबुजून लक्ष्य केल्याचा आरोप केला. युक्रेनियन दूतावासाने सांगितले – आज रशियाने युक्रेनमधील भारतीय कंपनी कुसुमच्या गोदामावर क्षेपणास्त्राने हल्ला केला. भारताशी विशेष मैत्री असल्याचा दावा करणारा रशिया जाणूनबुजून भारतीय कंपन्यांवर हल्ला करत आहे.

-------------

### वक्फ कायद्यावरून बंगालमध्ये हिंसाचार

**मुर्शिदाबाद, दि. १३ :** शनिवारी पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद, उत्तर २४ परगणा, हुगळी आणि मालदा जिल्ह्यात वक्फ कायद्याविरोधात हिंसक निदर्शने झाली. वाहने जाळण्यात आली, दुकाने आणि घरांची तोडफोड आणि लुटमार करण्यात आली. आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला आहे. १५ पोलिस जखमी झाले आहेत. १५० जणांना अटक करण्यात आली आहे.
पश्चिम बंगालमध्ये १0 एप्रिलपासून हिंसाचार सुरू आहे. केंद्र सरकारने हिंसाचारग्रस्त भागात १६00 सैनिक तैनात केले आहेत. यामध्ये ३00 बीएसएफ सैनिक आहेत. एकूण २१ कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत. हिंसाचारग्रस्त भागात इंटरनेटवर बंदी आहे. इछड चे कलम १६३ देखील लागू आहे.
मुर्शिदाबादमधील धुलियान येथून सुमारे ५00 लोक स्थलांतरित झाले आहेत. त्या सर्वांनी नदीपलीकडे असलेल्या मालदा येथील वैष्णवनगर येथील एका शाळेत आश्रय घेतला आहे. या लोकांचा आरोप आहे की, त्यांच्या घरांची तोडफोड करण्यात आली आणि त्यांना आग लावण्यात आली. पिण्याच्या पाण्यात विष मिसळले आहे. कसे तरी ते बीएसएफच्या मदतीने तेथून पळून गेले.

-------------

### जयपूरमध्ये अपघात; ५ जणांचा मृत्यू

**जयपूर, दि. १३ :** जयपूरमधील जामवरमगड येथे रविवारी सकाळी ट्रेलर आणि कारची समोरासमोर टक्कर झाली. या अपघातात कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. ही टक्कर इतकी भीषण होती की ट्रेलर रस्त्याच्या कडेला गेला आणि उलटला. गाडीतून मृतदेह बाहेर काढण्यासाठी पोलिसांना खूप मेहनत घ्यावी लागली. रायसर पोलिस स्टेशनचे अधिकारी रघुवीर सिंह यांनी सांगितले की, हा अपघात सकाळी ८ वाजता मनोहरपूर–दौसा महामार्गावर झाला. लखनऊ (उत्तर प्रदेश) येथील एक कुटुंब राजस्थानला भेट देण्यासाठी आले होते. कुटुंबात २ पुरुष, २ महिला आणि एक मूल होते. कुटुंबातील पाचही सदस्य दौसाहून खाटूश्यामजीकडे वर्ना कारने जात होते. दरम्यान, नेकावाला टोलजवळ कार आणि ट्रेलरमध्ये समोरासमोर टक्कर झाली. गाडीचा पुढचा भाग

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# मालीम खाजगी जेट्टी प्रकल्पाला पंचायतीचा तीव्र विरोध

## पर्यटन मंत्री म्हणतात आपल्याला माहितीच नाही

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १३ : मालीम येथे प्रस्तावित ८ कोटींच्या खाजगी जेट्टी प्रकल्पाला सरपंच स्वप्नील चोडणकर आणि स्थानिक रहिवाशांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. पंचायत सदस्य आणि स्थानिक मच्छीमारांच्या व्यवसायावर होणाऱ्या संभाव्य नकारात्मक परिणामांचा त्यांनी गंभीर इशारा दिला.**

पत्रकारांशी संवाद साधताना स्वप्नील चोडणकर यांनी सांगितले की, माझ्या माहितीप्रमाणे, केंद्र सरकारने मुंबईतील एका कंपनीला जेट्टी बांधण्याची परवानगी दिली आहे. परंतु, आम्हाला याबद्दल विश्वासात घेतले गेले नाही. जेट्टी कुठे बांधली जात आहे, याची आम्हाला अजिबात माहिती नाही.

चोडणकर यांनी अधिक माहिती देताना सांगितले की , पंचायत या प्रकल्पाविरोधात ठाम आहे. गावकऱ्यांना या प्रकल्पाची आवश्यकता नाही, आणि त्याचप्रमाणे आम्ही जेट्टी बांधण्याची परवानगी देणार नाही. स्थानिक आमदार, जे पर्यटन मंत्री देखील आहेत, त्यांनाही याबद्दल काहीच माहिती नाही. आम्ही आमदारांना सांगू इच्छितो की, जर जेट्टी बांधली गेली, तर ती स्थानिक मच्छीमारांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम करेल.

पंचायत सदस्य नारायण नाईक यांनीही याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की , मालीम येथे जेट्टी बांधली जात असल्याचे माध्यमांतून समजले. आम्हाला या प्रकल्पाचे ठिकाण आणि त्याच्या परिणामांची काहीही कल्पना नाही. लोकशाही असताना, केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने स्थानिक निवडून आलेल्या संस्थेला विश्वासात घेतल्याशिवाय या प्रकारचा प्रकल्प पुढे जाऊ शकत नाही.

नाईक यांनी याव्यतिरिक्त, आम्हाला या प्रकल्पाची आवश्यकता नाही. जर आवश्यक झाले तर आम्ही आंदोलन करू आणि रस्त्यावर उतरू. स्थानिक लोकांना या प्रकल्पामुळे काय फायदे होणार आहेत, हे त्यांना योग्य प्रकारे समजावून सांगितले पाहिजे.

आम्ही पंचायत बंदर कॅप्टनला पत्र लिहून विचारू की, त्यांना या जेट्टीबद्दल काही माहिती आहे का. आम्हाला हे देखील विचारायचे आहे की, पंचायतीला एनओसी दिली का, आणि जर दिली असेल, तर ती आमच्या कडे का नाही ? असा प्रश्न देखील चोडणकर यांनी उपस्थित केला.

दरम्यान, मंत्री आणि पर्वरीचे आमदार रोहन खंवटे यांनी सांगितले की, त्यांना मांडवी नदीवरील मालीम येथील जेट्टी प्रकल्पाबद्दल माहिती नव्हती आणि त्याबद्दल माध्यमांतूनच कळले. ते म्हणाले की, मला या प्रकल्पाबद्दल माहिती नव्हती. मी पंचायतीशी चौकशी केली आहे आणि त्यांनी सांगितले की त्यांनी कोणतीही परवानगी दिली नाही. जर केंद्र सरकारने परवानगी दिली असेल, तर त्याचे कारण काय, याची पारदर्शक माहिती आवश्यक आहे.

खंवटे यांनी स्थानिक मच्छीमारांच्या भावना समजून घेण्याचे महत्त्व सांगितले आणि लोकांना विश्वासात घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. माझ्या दृष्टीने, प्रकल्पाबद्दल लोकांचे मत घेणे आणि त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक आहे. जर लोकांना यामध्ये खरेच फायदा होत असेल, तर त्यांना योग्य प्रकारे समजावून सांगायला हवे, असे त्यांनी स्पष्ट केले.

९ एप्रिल २०२५ रोजी, इनलँड वॉटरवेज अथॉरिटी ऑफ इंडिया ने मरीना इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडला या प्रकल्पासाठी डिजिटल ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. या प्रकल्पाचा उद्देश नदी क्रूझ पर्यटनाला प्रोत्साहन देणे आणि राष्ट्रीय जलमार्गांवर खाजगी जेट्टी बांधण्याच्या नवीन नियमांनुसार तो मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पाबद्दल स्थानिक रहिवाशांचा आणि निवडून आलेल्या संस्थांचा विश्वास घेतल्याशिवाय तो पुढे जाऊ नये, असे अनेक लोकशाहीवादी नेत्यांचे मत आहे.

# चर्चिल ब्रदर्सने सुपर कपमधून घेतली माघार

■ टीम दैनिक हेराल्ड

▸ एआयएफएफवर गंभीर आरोप

**मडगाव, दि. १३ :** चर्चिल ब्रदर्स एफसी गोवाने अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या विरोधात गंभीर नाराजी व्यक्त करत सुपर कप २०२५ स्पर्धेमधून अधिकृत माघार घेतली आहे. सुपर कपच्या ड्रॉ प्रक्रियेत अनियमितता आणि अपारंपरिकता असल्याचा आरोप करत, तसेच आय–लीग २०२४–२५ चे विजेतेपद नाकारल्याबद्दल फेडरेशनवर तीव्र टीका करण्यात आली आहे.

१२ एप्रिल रोजी एआयएफएफ अध्यक्ष कल्याण चौबे यांना पाठवलेल्या पत्रात चर्चिल ब्रदर्सने आपल्या निषेधाची स्पष्ट नोंद केली. नियम व क्रीडा सन्मानाचा केलेला अवमान पाहता, आमच्यासमोर सुपर कपमधून माघार घेणे हाच एकमेव पर्याय शिल्लक राहतो,असे क्लबने पत्रात नमूद केले.

क्लबने दावा केला आहे की, सुपर कपचे ड्रॉ अत्यंत अपारदर्शक पद्धतीने घेतले गेले असून, यासंदर्भात ९ एप्रिल रोजी एआयएफएफ ला पत्राद्वारे आक्षेप नोंदवण्यात आला होता. मात्र, फेडरेशनकडून कोणतेही उत्तर मिळाले नसल्याचे क्लबने सांगितले.

आयएसल आणि आय लीग संघांसाठी भिन्न निकष लावले गेले असून, आमच्या क्रीडा गुणवत्तेचा अनादर करण्यात आला आहे, असे चर्चिल ब्रदर्सने स्पष्ट केले. त्यांनी नमूद केले की आय–लीग टेबलमध्ये अव्वल असतानाही त्यांना १४वे स्थान देण्यात आले, तर इंटर काशीला प्राधान्य देण्यात आले.

चर्चिल ब्रदर्सने एआयएफएफ वर आरोप केला आहे की, त्यांच्या निर्णयामुळे इंटर काशीने स्वत:ला आय–लीग २०२४–२५ चा विजेता म्हणून चुकीचे सादर करण्याचा प्रयत्न केला. एआयएफएफच्या या कृतीमुळे केवळ क्लबचे नव्हे, तर भारतीय फुटबॉलच्या निष्पक्षतेचे नुकसान झाले आहे, असा आरोप करण्यात आला.

एआयएफएफने अद्याप चर्चिल ब्रदर्सला विजेत्याचे ट्रॉफी न दिल्याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. जागतिक स्तरावर तसेच राष्ट्रीय पातळीवरही अंतिम सामन्यानंतर विजेता घोषित केला जातो. परंतु, येथे नियम १४.४ असूनही आम्हाला अधिकृत मान्यता नाकारण्यात आली, असे क्लबने म्हटले आहे. एआयएफएफकडून या प्रकरणावर अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. तथापि,

पान २ ▶

# जिल्हा अग्निसुरक्षा कृती आराखड्याची गोवाकॅनची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिन (१४ एप्रिल) आणि अग्निरोधक सप्ताह (१४ ते २० एप्रिल) यांच्या पार्श्वभूमीवर गोवा सिविक अँड कंझ्युमर नेटवर्क (गोवाकॅन) ने राज्यातील वाढत्या आगीच्या घटनांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. तसेच २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी जिल्हास्तरीय अग्निसुरक्षा कृती आराखडा तयार करण्याची जोरदार मागणी केली आहे.

अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा विभागाचे संचालक नितीन व्ही. रायकर यांना संबोधित पत्राद्वारे गोवाकॅन ने आगीच्या घटनांमध्ये होत असलेल्या सातत्यपूर्ण वाढीचा उल्लेख करत या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याचे आवाहन केले आहे. मागील आठवड्यात मडगाव येथील इमारतीत आणि मापसा येथील सुपरमार्केटमध्ये लागलेल्या आगीत झालेल्या नुकसानीचा संदर्भ देत गोवाकॅन ने ही संकटाची सूचना असल्याचे स्पष्ट केले आहे.

या घटनांमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान तर झालेच आहे, परंतु मानसिक तणाव व दीर्घकालीन चिंता देखील निर्माण झाली आहे. या घटनांपैकी बऱ्याचशा टाळता येण्यासारख्या होत्या, मात्र संबंधितांनी त्यांच्या घरी, व्यवसायात किंवा कार्यस्थळी अग्निसुरक्षा योजना तयार केलेली नव्हती, असे गोवाकॅनच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

गोवाकॅन ने पुढे सुचवले आहे की, जिल्हास्तरीय अग्निसुरक्षा कृती आराखड्याच्या माध्यमातून विविध भागधारकांचा सहभाग घेतला जावा. यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन करून दर सहा महिन्यांनी एकदा बैठक घेण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. या आराखड्यात उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या हंगामांचे विश्लेषण करून उपाययोजना निश्चित करता येतील.

समन्वय समितीत जिल्हा पंचायत, नगर परिषद, ग्रामपंचायती, गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री,

पान २ ▶

# हरमल ग्रामसभेत सचिवांच्या कार्यशैलीवर संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १३ :** हरमल ग्रामसभेच्या बैठकीत सचिवांच्या कार्यशैलीविरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मधलावाडा प्रभागात 'हर घर जल' योजनेच्या ठरावाची कार्यवाही न केल्याने आणि सचिवांच्या उद्धट वागणुकीमुळे ग्रामस्थांनी पंचायत सचिव सुभाष कांबळी यांची बदली करण्याची मागणी केली.

ग्रामस्थ मार्सेलीन फर्नांडीस यांनी योजनेच्या अंमलबजावणीविषयी संताप व्यक्त करत, 'हर घर जल' योजनेचा लाभ त्यांच्या वाड्याला मिळाला नाही, असे सांगितले. तसेच, विहिरीतील पाणी दूषित असून, खाडीचे पाणी देखील दूषित असल्याने, पंचायतने आरोग्य विभागाला तपासणी करण्याची मागणी केली.

एडविन डिसुझा यांनी सचिवांच्या कार्यशैलीवर टीका करत, 'सचिव ग्रामस्थांच्या प्रश्नांवर जाब देऊ शकत नाही, आणि पंचही कोण नसल्याने सरपंचांनी या विषयावर उत्तर दिले पाहिजे,' असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, 'सचिवाने ग्रामस्थांना उद्धट उत्तर दिल्यामुळे त्याची बदली करावी.' सरपंच अनुपमा मयेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही ग्रामसभा पार पडली. पंचायत सचिव सुभाष कांबळी यांनी मागील बैठकीचा वृत्तांत वाचून दाखवला, ज्यावर नागरिकांनी आपत्ती व्यक्त केली.

काही मुद्द्यांवर चर्चा करताना, पंचायत सचिवांच्या इतर कार्यांबद्दलही गंभीर आरोप करण्यात आले. ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, पंचायत सचिव कोर्ट प्रकरणांमध्ये आवश्यक माहिती वकिलांना देत नाहीत, ज्यामुळे ते अनेक वेळा अपयशी ठरले आहेत. मार्सेलीन फर्नांडीस यांनी सचिवांच्या चुकीच्या वागणुकीमुळे त्यांच्यावर आणखी आरोप ठेवले आणि आपल्या व्यवसायासाठी चुकीची माहिती वकिलांना दिल्यामुळे आपल्याला मोठी आर्थिक हानी झाली, असे सांगितले.

साधारणपणे, ग्रामसभेत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. एक प्रमुख विषय होता रस्त्यांवर बेकायदेशीर बांधकामांचा. या संदर्भात माजी सरपंच इनासीयों डिसोझा आणि संजय नाईक यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना स्थानिक बैठक आयोजित करण्याचा प्रस्ताव दिला. ग्रामीणांच्या घरांसाठी सरकाराच्या योजना असल्या तरी, ते योग्य प्रकारे कार्यान्वित होत नाहीत, आणि यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्यामुळे पंचायतीने भविष्यात या मुद्द्यांवर बैठक घेण्याची सूचना दिली.

याशिवाय, कचऱ्याची उचल आणि गावातील रस्त्यांवर असलेला कचरा हे देखील मोठे समस्येचे विषय ठरले. ग्रामस्थांनी कचरा नियंत्रणासाठी कॅमेरे बसवण्याची मागणी केली आणि मधलावाडा भागात कचरा संकलनासाठी नवीन उपाययोजना करण्यावर चर्चा केली. सरपंच अनुपमा मयेकर यांनी कचऱ्याच्या समस्येवर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आणि प्रत्येक

पान २ ▶

# दुचाकी ट्रकला धडकल्याने दोन तरुणांचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड

**कुळे, दि. १३ :** मोले–नंद्रण राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकला भरधाव दुचाकीने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोघा तरुणांचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी पहाटे साडेचारच्या सुमारास घडली. मृत युवक कर्नाटक राज्यातील असून, त्यांची नावे राजेश देसाई (२५, रा. जोईडा, कर्नाटक) आणि निखिल मडिवळ (२४, रा. हल्याळ, उत्तर कर्नाटक) अशी आहेत.

कुळे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोले – नंद्रण मार्गावर कर्नाटकात जाणारा एक अवजड ट्रक अचानक बंद पडल्याने रस्त्यावर थांबला होता. याच दरम्यान, राजेश देसाई हे गोव्याहून कर्नाटकच्या दिशेने दुचाकीवरून निघाले होते. त्यांच्या पाठीमागे निखिल मडिवळ बसले होते. भरधाव वेगाने जात असलेली त्यांची दुचाकी रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकच्या मागील भागावर आदळली. जोरदार धडकेत दोघेही गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच मोले आऊट पोस्टमार्फत कुळे पोलिस स्थानकात कळविण्यात आले. पोलिस निरीक्षक राघोबा कामत यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विभावरी गावकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने उसगाव–पिळये प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना दाखल करताच मृत घोषित केले. घटनास्थळी पंचनामा करून दोघांचेही मृतदेह उत्तर तपासणीसाठी मडगाव येथील जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले.

दरम्यान, प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, राजेश देसाई हे दुचाकी अत्यंत वेगात चालवत होते. त्यामुळेच त्यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकचा अंदाज घेता न आल्याचे बोलले जात आहे. वेगावर नियंत्रण न राखल्यामुळे अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या दुर्दैवी अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.या घटनेचा पुढील तपास उपनिरीक्षक गावकर करत आहेत.

# 'मी आजारी आहे' म्हणत होता राणा, पण...

## तहव्वूर राणावर भारतात चौकशीचा धडाका, एनआयएचा कसून तपास सुरू

नवी दिल्ली, दि. १३ :

२६/११ च्या मुंबईतील भीषण दहशतवादी हल्ल्याप्रकरणी प्रमुख संशयित तहव्वूर राणाने प्रत्यार्पण रोखण्यासाठी जोरदार कायदेशीर लढा दिला होता अशी माहिती आता समोर आली आहे. त्याच्या वकिलांनी अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाला २१ जानेवारी २०२५ रोजी पत्र लिहून, तब्बल ३0 हून अधिक आरोग्य तक्रारींचा उल्लेख करत प्रत्यार्पण थांबवण्याची विनंती केली होती. त्यात भारतीय तुरुंगातील कथित अमानवीय परिस्थिती आणि धार्मिक तसेच वांशिक छळ होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

राणाचे वकील जॉन डी. क्लाईन यांनी म्हटले होते की, राणा पाकिस्तानी वंशाचा मुस्लिम असून त्याच्यावर भारतातील सर्वात मोठ्या दहशतवादी हल्ल्यात सहभागाचा आरोप आहे. त्यामुळे भारतात त्याला अत्यंत कठोर आणि



अमानुष वागणूक दिली जाऊ शकते. हे मानवाधिकारांचे गंभीर उल्लंघन ठरेल. तसेच त्यांनी भारतीय तुरुंगातील खराब परिस्थितीचा दाखला देत राणा न्यायालयीन प्रक्रियेपूर्वीच मृत्युमुखी पडू शकतो, असा इशारा दिला होता. राणाच्या आरोग्य स्थितीचा उल्लेख करत त्यांनी सांगितले होते की, त्याला पार्किन्सन, हृदयरोग, मूत्रपिंड विकार (स्टेज ३), क्षयरोग, दमा, सीओपीडी, सायनस, सोरायसिस यांसारख्या अनेक गंभीर व्याधींनी ग्रासले आहे. त्याच्या मूत्राशयात कर्करोगाच्या संशयाचे गाठ असल्याचेही नमूद करण्यात आले.

तथापि, अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्या कार्यालयाने राणाच्या छळाच्या दाव्यांना फेटाळून लावत त्याचे प्रत्यार्पण संयुक्त राष्ट्रांच्या अत्याचारविरोधी करारासह आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत असल्याचे स्पष्ट केले. भारतातील संबंधित यंत्रणांनी राणाच्या वैद्यकीय उपचारांची पूर्वतयारी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अमेरिकेकडून मागवली आहेत.

दिल्लीत दाखल झाल्यानंतर राणाला एनआयएच्या कोठडीत पाठवण्यात आले असून, चौकशीदरम्यान त्याने २६/११ च्या कटकारस्थानात घेतलेल्या सहभागाची माहिती मिळवण्यावर भर दिला जाणार आहे. या चौकशीत राणा हल्ल्यापूर्वी दुबईमध्ये भेटलेल्या व्यक्तींची भूमिका, तसेच मुंबईतील त्याच्या इमिग्रेशन एजन्सीच्या कार्यालयाचा वापर; ज्याचा कथितपणे डेव्हिड हेडलीने रेकीसाठी वापर केला होता याचा तपशीलही समोर येण्याची शक्यता आहे.

एनआयए राणाचे आवाज नमुनेही गोळा करण्याची शक्यता आहे, जेणेकरून हल्ल्याशी संबंधित कॉल रेकॉर्डची पडताळणी करता येईल. तसेच चौकशीत पाकिस्तानी दहशतवादी इलियास काश्मिरी, अब्दुर रहमान, झाकीउर रहमान लखवी आणि साजिद मजीद मीर यांच्या भूमिकेचीही छाननी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान १९९0 च्या बॅचचे महाराष्ट्र कॅडरचे वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि सध्या राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) महासंचालक असलेले सदानंद दाते हे आता तहव्वूर राणाच्या चौकशीची धुरा सांभाळणार आहेत. २६ नोव्हेंबर २00८ रोजी, मुंबईवर झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या वेळी, सदानंद दाते हे मध्य विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत होते. हल्ल्याच्या वेळी, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळील कामा आणि अल्ब्लेस रुग्णालयात धाव घेतली होती. दहशतवादी अजमल कसाब आणि त्याचा साथीदार सीएसएमटी स्थानकावर हल्ला करून, पादचारी पुलातून कामा रुग्णालयात घुसल्याचे कळताच दाते आणि त्यांची टीम घटनास्थळी पोहोचली.

या ठिकाणी झालेल्या चकमकीत दाते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दहशतवाद्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केलेल्या धाडसी प्रयत्नांमुळे काही क्षणांसाठी परिस्थिती नियंत्रणात आणता आली. मात्र, दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार आणि ग्रेनेडचा वापर करत बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. या संघर्षात दाते जखमी झाले, पण त्यांच्या धैर्यशील कामगिरीसाठी त्यांना राष्ट्रपती पोलिस पदकाने सन्मानित करण्यात आले.

या घटनेनंतर, कसाब आणि त्याच्या साथीदाराने पुढे जाऊन एटीएस प्रमुख हेमंत करकरे, अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक कामटे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय साळसकर यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांची हत्या केली. मात्र, दाते यांच्या प्रतिकारामुळे एका दहशतवाद्याच्या क्षमतेवर मर्यादा आल्या होत्या.

दाते यांनी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे प्रमुख तसेच महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाचे नेतृत्व करताना महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. याशिवाय, केंद्रीय राखीव पोलिस दलात (उठझऋ) त्यांनी माओवादी विरोधी मोहिमांची जबाबदारी पार पाडली असून, आयजी (ऑपरेशन्स) म्हणून काम करताना त्यांनी डाव्या विघातक गटांविरोधात महत्त्वाची कार्यवाही केली.